# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 08.04.2025** **वार- मंगळवार**

---

१) शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन मिळाल्यास देशातील प्रत्येक गाव स्वावलंबी आणि गरीबीमुक्त होईल- केंद्रीय कृषिमंत्र्यांचं प्रतिपादन

२) घरगुती वापराच्या एलपीजी सिलिंडरच्या किमतीत ५० रुपयांची वाढ

३) अमेरिकेनं वाढवलेल्या करांमुळं देशासह जगभरातल्या अनेक शेअर बाजारात मोठी पडझड,

४) मुंबईतील तीन सायबर प्रयोगशाळांचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

आणि

५) जैन अल्पसंख्याक विकास आर्थिक महामंडळ 'जैन मराठी विश्वकोशाची' निर्मिती करणार

**<u>कृषि मंत्री महासंवाद</u>**

दर्जेदार उत्पादनासाठी शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन आणि प्रशिक्षण मिळालं तर देशातील प्रत्येक गाव स्वावलंबी आणि गरीबीमुक्त होईल असं प्रतिपादन केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी केलं. नंदुरबारच्या कृषी विज्ञान केंद्रात कृषी विज्ञान मंडपम आणि महिला तंत्रज्ञान पार्कचं उद्घाटन काल चौहान यांच्या हस्ते झालं; त्यावेळी ते बोलत होते. राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, ज्येष्ठ शास्त्रज्ञ अनिल काकोडकर यावेळी उपस्थित होते. राज्यात अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी विमा आणि इतर योजनांमधून केंद्र सरकार पैसा पुरवत आहेच, पण आवश्यकतेप्रमाणे

राज्य सरकारनं मागणी केली तर अतिरिक्त मदत दिली जाईल, असंही शिवराजसिंग चौहान यांनी सांगितलं.

**<u>एलपीजीसिलिंडरपूल</u>**

केंद्र सरकारनं घरगुती वापराच्या एलपीजी सिलिंडरची किंमत ५० रुपयांनी वाढवली आहे. उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना हे सिलिंडर ५५० रुपयांना तर इतरांना ८५३ रुपयांना मिळतील, अशी माहिती पेट्रोलियम मंत्री हरदीपसिंग पुरी यांनी काल नवी दिल्लीत वार्ताहरांना दिली.
पेट्रोल आणि डिझेलवरचं उत्पादन शुल्क लिटरमागे २ रुपयांनी वाढवण्याचा निर्णयही केंद्र सरकारनं घेतला आहे. पण त्याची झळ सर्वसामान्य नागरिकांना जाणवणार नाही. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किंमती कमी झाल्या आहेत. त्यामुळं पेट्रोलियम कंपन्यांना स्वस्तात कच्चे तेल मिळते आहे. परिणामी या शुल्कवाढीचा फटका ग्राहकांना जाणवणार नाही, असं पेट्रोलियम मंत्र्यांनी सांगितलं.

**<u>शेअर</u>**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केलेल्या आयात शुल्क धोरणाचे गंभीर परिणाम काल जगभरातल्या विविध देशांसह भारतीय शेअर बाजारांवरही दिसले. भारतीय शेअर बाजारात काल आठवड्याच्या सुरुवातीलाच तीव्र घसरण पाहायला मिळाली. दिवसभराच्या चढ उतारानंतर दिवस अखेर मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक 2 हजार 227 अंकांनी घसरून 73 हजार 138 अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीमध्ये 743 अंकांची घट होऊन बाजार 22 हजार 162 अंकांवर स्थिरावला.

**<u>मुख्यमंत्री पोलिस सायबर</u>**

सायबर गुन्हेगारी रोखणं आणि सायबर गुन्हेगारांना पकडणं हे भविष्यातलं सर्वात मोठं आव्हान असून ते पेलण्यासाठी मुंबई पोलीस दल सज्ज असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

मुंबई पोलीस दलाच्या विविध उपक्रमांचं लोकार्पण काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. सायबर गुन्हेगारी नियंत्रणात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर असल्याचं त्यांनी सांगितलं.

सायबर गुन्हे रोखण्यासाठी महत्वाच्या असलेल्या मुंबईतल्या तीन अत्याधुनिक सायबर प्रयोगशाळांचं लोकार्पणही काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं. सायबर गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यासाठी सायबर प्रयोगशाळांचं जाळं सक्षम करण्याच्या सूचना त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले

**दिव्यांग धोरण मुख्यमंत्री**

दिव्यांगांच्या सर्वांगीण विकासासाठी नवनवीन योजना आणि धोरणांची निर्मिती करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल कौशल्य विकास आणि उद्योग विभागाला दिले. मुंबईत दिव्यांग बांधवांच्या विविध समस्यांबाबत आयोजित आढावा बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी उपस्थित होते. दिव्यांग लाभार्थ्यांचं अर्थसहाय्य वाढवण्याबाबत शासन सकारात्मक असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**इंट्रो**

**जैन मराठी विश्वकोश**

जैन अल्पसंख्यांक विकास आर्थिक महामंडळाच्या वतीनं जैन मराठी विश्वकोशाची निर्मिती करण्यात येणार आहे. महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. हा विश्वकोश पुण्यात तयार होणार असून पहिल्या खंडाचा टप्पा साधारण तीन वर्षांचा असेल. याविषयी अधिक माहिती देताना ललित गांधी म्हणाले ----

**दीनानाथ रुग्णालय**

पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात उपचारासाठी दाखल झालेल्या गर्भवतीच्या मृत्यूला रुग्णालयंच जबाबदार असल्याचं चौकशी समितीच्या अहवालातून समोर आलं

असल्याची माहिती राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी काल  पुण्यात दिली. पुण्यात पुणे पोलिस आयुक्तालयात झालेल्या बैठकीनंतर, पत्रकार

परिषदेत त्या बोलत होत्या. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने रुग्णाची वैयक्तिक माहिती प्रसारित केली; याबाबत रुग्णालयाला समज देण्यात येईल, असं चाकणकर म्हणाल्या. या प्रकरणी माता मृत्यू अन्वेषण समिती आणि धर्मादाय आयुक्त यांचे अहवाल आल्यानंतर रुग्णालयावर योग्य कारवाई करण्यात येईल असं चाकणकर म्हणाल्या.

दरम्यान, या प्रकरणाशी संबंधित डॉक्टर सुश्रुत घैसास यांनी राजीनामा दिला असल्याची माहिती दीनानाथ रुग्णालयाचे वैद्यकीय संचालक डॉक्टर धनंजय केळकर यांनी काल पत्रकार परिषदेत दिली. रुग्णाकडून किंवा त्यांच्या नातेवाईकांकडून आगाऊ रक्कम घेण्याचं धोरण रुग्णालयानं रद्द केलं आहे; तसंच या प्रकरणानंतर, रुग्णाशी संवेदनशीलतेनं वागण्याबाबत रुग्णालयातील सर्व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिलं जाईल, असं डॉक्टर केळकर यांनी सांगितलं.

**<u>जागतिक आरोग्यदिन</u>**

राज्य शासनाच्या आरोग्य विभागाच्या विविध योजनांचा लाभ सामान्य नागरिकांपर्यंत पोहचवण्यासाठी आरोग्य विभागाने सातत्याने प्रयत्न करणं आवश्यक आहे; असं प्रतिपादन विधान परिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे यांनी काल मुंबईत केलं. जागतिक आरोग्य दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी विविध आरोग्य सेवा योजनांचा प्रारंभ करण्यात आला; आरोग्य विभागात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या डॉक्टर्स, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा तसंच आरोग्य सेवा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या आरोग्य संस्थांचा सन्मान करण्यात आला.

जागतिक आरोग्य दिनानिमित्त काल राज्यात विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. धाराशिवमधल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारतीसाठी शासनानं 403 कोटी 89 लाख रुपयांच्या अंदाजपत्रकाला प्रशासकीय मान्यता दिली असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

नंदुरबार जिल्ह्यात तीन दिवसीय ‘आरोग्य मंथन शिबिर’ होत आहे. नवी मुंबई महानगरपालिकेतील आरोग्य कर्मचाऱ्यांचा काल सन्मान करण्यात आला. तर सांगलीतही पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली विविध आरोग्यविषयक कार्यक्रम झाले.

**शिबिर**

रत्नागिरी जिल्ह्यातल्या सर्व मुली आणि महिलांना कर्करोग प्रतिबंधक एच पी व्ही लस देण्यासाठी तालुका स्तरावर शिबिरं आयोजित करण्याचे निर्देश पालकमंत्री डॉ. उदय सामंत यांनी दिले आहेत. या संदर्भात आयोजित बैठकीत ते काल बोलत होते. अंगणवाडी सेविकांच्या समस्यांसंदर्भातली एक बैठकही पालकमंत्र्यांनी काल घेतली.

**डिजिटल शिक्षण प्रारामशिंदे**

डिजिटल स्कूल या संकल्पनेअंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातल्या १११ शाळांमधे इंटरॅक्टिव्ह टच पॅनल आणि डिजिटल ई लर्निंग सॉफ्टवेअरचं लोकार्पण काल विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीनं करण्यात आलं. आजचं युग हे डिजिटल तंत्रज्ञानाचं आहे. त्यामुळे डिजिटल शिक्षणाचं धोरण स्वीकारणं ही काळाची गरज असल्याचं प्रा. शिंदे यांनी यावेळी सांगितलं. या कार्यक्रमात जिल्हा परिषद शाळेतल्या दोन विद्यार्थ्यांनी शिंदे यांच्याशी संवाद साधला.

**बदलापूर**

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातला आरोपी अक्षय शिंदे याच्या चकमक प्रकरणी पाच पोलिसांविरुद्ध गुन्हे दाखल करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयानं काल दिले. या प्रकरणी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेचे सहआयुक्त लखमी गौतम यांच्या देखरेखीखाली एसआयटी स्थापन करण्याचे आदेशही उच्च न्यायालयानं दिले आहेत.

**चैत्रयात्रा**

श्री क्षेत्र पंढरपूर इथं चैत्र एकादशीच्या निमित्तानं आज पहाटे विठ्ठल आणि रुक्मिणीची नित्य पूजा पार पडली. चैत्र यात्रेनिमित्त राज्याच्या विविध भागातून सुमारे ३ लाख भाविक पंढरपुरात दाखल झाले आहेत. आज पहाटे हजारो भाविकांनी चंद्रभागेमध्ये स्नान केलं.

**IPL**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल मुंबईत झालेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बेंगलोर संघानं मुंबई इंडियन्स संघावर १२ धावांनी विजय मिळवला. मुंबई इंडियन्सनी नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला RCB नं दिलेल्या २२२ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना मुंबई इंडियन्स संघ २० षटकांत ९ गडी बाद २०९ धावाच करू शकला.

**हवामान**

राज्यात सर्वत्र सध्या, तापमानात मोठी वाढ होत असून, विदर्भात अमरावती, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, यवतमाळसह नाशिक आणि पुण्यातही पारा ४० अंशांच्या पुढे गेला आहे. येत्या २४ तासात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी हवामान उष्ण आणि वातावरण दमट राहण्याची शक्यता आहे तर याच कालावधीत विदर्भात उष्णतेची लाट येण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार**